Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
UGC CARE I

# श्रीकांत देशमुख यांच्या कवितेतील ग्रामीण जीवनाचे दाहक चित्रण

**मुक्ता मारोतराव रोकडे,** संशोधक, स्नातकोत्तर मराठी विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.
**डॉ. राकेश देवरावजी कभे,** संशोधन मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख, महात्मा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय, पारशिवनी, जि. नागपूर.

**सारांश**

श्रीकांत देशमुख हे नव्वोदत्तर ग्रामीण कवितेमधील एक लक्षणीय कवी आहेत. श्रीकांत देशमुख यांच्या 'बळिवंत' (१९९७), 'आषाढमाती' (२००३) आणि 'बोलावे ते आम्ही' (२०१३) या संग्रहातील कविता हे ग्रामीण कवितेतील आधुनिकतावादी संवेदनशीलतेचा एक उग्र आविष्कार आहे. संवेदना संपलेला समाज भयावह असतो तो तसा होऊ न देणे हा साहित्यिकांचा प्रयत्न असतो. यांची कविता विठ्ठल आणि पंढरपुरातल्या असंख्य प्रतिमांनी व्यापलेली आहे. ज्याप्रमाणे ज्ञानोबा, तुकोबा या संतांनी आपल्या अभंगांमधून विद्रोह मांडला, तसाच विद्रोह कवी आधुनिक जाणीवे द्वारे मांडत आहेत. कवीने ग्रामीण भागाचे प्रणय - शृंगार आणि रम्य निसर्ग चित्रण न करता कवीने प्रखर वास्तवाचे दाहक चित्रण केले आहे. त्यांच्या काव्यसंग्रहातील प्रत्येक कविता, अभंग, कृषी जनव्यवस्थेविषयी काही मांडू इच्छिते. ग्रामीण जीवनाचा ऱ्हास आणि विनाश आणि त्याची शिकार झालेल्या शेतकऱ्याच्या उध्वस्त जीवनाचे चित्रण यांच्या कवितेत मध्यवर्ती आहे. मोडका गावगाडा, बिन बैलाची तुटलेली गाडी, पडके देऊळ, ढासळती शाळा, रक्ताने माखलेले शेत, आटलेले तळे, पाखरासारखा माळ,कुजलेले दाणे आणि वाळलेली पाने,तुटक्या खाटेवरची मरणारी म्हातारी आणि चुलीतली राख आणि निखारे सावरत बसलेली रांडव बाई इ. गोष्टी त्यांच्या कवितेत येतात.

**सूचक शब्द**

ग्रामीण, दाहक, मरणासंपन्न, बेवारस, नागवला, नरभक्षक, रांडपण, स्वावलंबीपणाने, इझम, निरर्थकता, विद्रोह, दुभंगलेपण इ.

**विषय विवेचन**

कवी श्रीकांत देशमुख हे १९८० नंतरच्या काळात लेखन करणारे एक महत्त्वाचे कवी आहेत. त्यांनी काव्य लेखनासह वैचारिक व ललित गद्य लेखन केले आहे. 'बळिवंत', 'आषाढमाती', आणि 'बोलावे ते आम्ही' या तीनही संग्रहातील कविता शेतीच्या जागतिकीकरणाच्या वर्तमानापर्यंत बदलत जाणारे कृषी वास्तव केंद्र स्थानी असणारी कविता आहे. कुटुंब, समाज, गावगाडा, आणि शेतीच्या अनुषंगाने स्त्रियांचे अस्तित्व, भूमिका, वर्तन, व्यवहार आणि एकूणच शेतीनिष्ठ जीवन जगणाऱ्या समूहातील स्त्री जीवनावर सुद्धा ही कविता भाष्य करते. कवीचा जन्म शेतकरी कुटुंबात झालेला असल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा जवळून बघितल्या व अनुभवल्या आहेत. त्यांच्या वडिलांच्या मते, "आमच्या सारखा तू सुद्धा मातीत राबशील तर तुझ्याही पदरी निराशा येईल हालअपेष्टांचे जगणे तुझ्या वाट्याला येईल." असे म्हणणाऱ्या त्यांच्या वडिलांनी कवी श्रीकांत देशमुख यांनी शेती व्यवसायापासून दूर गेले पाहिजे, खेड्यातून बाहेर पडले पाहिजे, शहरात शिकून आपले ध्येय गाठले पाहिजे, अशी जाणीव त्यांच्यात निर्माण केली. कवी जरी शेतीवर अवलंबून नाही, तरी त्यांच्या मनात कृषक समाजाविषयी तळमळ आहे. त्यांच्या मते ज्या समूहाचे प्रतिनिधित्व करून कवी आज शहरात जगत आहे, त्या समूहाची अवस्था आज काय आहे, आज कृषी संस्कृतीची अवस्था काय आहे, रूढी बदलल्या, माणसे बदलली, खेड्याचे शहरीकरण होत असतानाही, इथल्या माणसांचे शहरीकरण होत असतानाही इथल्या माणसांचे मूळ शेतीचे जे वर्षानुवर्षे प्रश्न आहेत ते मात्र सुटलेले नाहीत. आणि याचा पुरावा म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि हेच ग्रामीण समाजातील स्त्रियांचे जीवन, शेतकऱ्यांच्या, तरुणांच्या आत्महत्या, दुष्काळ,स्थलांतर, नात्यातील दुरावा, इत्यादी गोष्टींचे दाहक चित्रण त्यांच्या कवितेत आलेले आहे.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

प्रबळ ग्रामसंस्कृती असलेला भारत देश जागतिकीकरणानंतर व्यापारप्रधान बनला. शेती आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी खुली झाल्याने ग्रामीण भागाचे अस्तित्व धोक्यात आले. शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले. जागतिकीकरण, उदारीकरण, बहुराष्ट्रीय कंपन्या खुली, अर्थव्यवस्था, जागतिक वित्त संस्था, शेतीसाठी खुला व्यापार, अशा अनेक आर्थिक उलाढाली यांनी भारतीय कृषी व्यवस्था चांगलीच तडकली. खुल्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार देशभर गेल्या नव्वदोत्तरी नंतर केला गेला. आणि त्याचा परिणाम भारतीय शेती आणि उद्योगावर झाला. कालचा सदन शेतकरी आज कमालीचा भिकारी झाला. त्याच्यासमोर आत्महत्या शिवाय दुसरा पर्यायच उरला नाही. शेतकरी तसेच शेतमजुर उघड्यावर पडला. शेतीच संपूर्ण अर्थशास्त्र कोसळलं. खेडी उजाड झाली. जमिनीला बुडाया पडल्या. दांडातलं पाणी आटलं. कुणब्यांची घर ओस पडू लागली. खेड्यांचीही लहान लहान शहरं झाली. शहरी माध्यमाने खेड्यात, खेड्यांवर आक्रमण केलं. संयुक्त कुटुंब पद्धती जाऊन विभक्त कुटुंब पद्धती आली. अशा प्रकारे नव्वदनंतरचे ग्रामीण भागात झालेले बदल आणि या बदलामुळे ग्रामीण भागातील समाजावर झालेले परिणाम श्रीकांत देशमुखांनी आपल्या कवितांमधून चित्रित केलेले आहे.

'बळिवंत' हा श्रीकांत देशमुख यांच्या कविता व अभंगांचा संग्रह आहे. शेती, शेतकरी, कुटुंब, गाव, समूहभाव, प्राणी, पशु- पक्षी, दुःख, दारिद्र्य, तुटलेपण, नडलेपण, नातेसंबंध, आपलेपण, निसर्ग, दुष्काळ, पाऊसपाणी या सर्वांसहित निसर्ग आणि माणूस ह्यातील अखंड भाऊबंध शोधण्याचा प्रयत्न ही कविता करते.

'आषाढमाती' या काव्यसंग्रहाच्या केंद्रस्थानी कृषी ग्रामव्यवस्था आहे. या संग्रहात पूर्वीची समृद्ध अशी एकत्र कुटुंब पद्धती आणि आता माणसामाणसातील आत्मीय घरसंस्कृती कालप्रवाहात कशाप्रकारे हरवत चालली याचे शब्दचित्र कवीने 'डोळे मिटून बसलेलं घर' आणि 'मातीत मान घातलेलं घर' या कवितांमध्ये रेखाटले आहे. हे घर म्हणजे भारतीय गावगाडा आहे. दुष्काळामुळे शासनाच्या नीती नियमांमुळे, शेतकऱ्यांवर कशी आत्महत्येची वेळ येते, याचे चित्रण 'तरणी पोरं' या कवितेत आलेले आहे. ही उध्वस्तता खेड्यापाड्यात चोहोबाजूंनी येते. निसर्ग, शासन, नीती, आणि नियती या चक्रामध्ये अडकलेलं कुटुंब पूर्णतः उद्ध्वस्त होऊ लागतं. ही स्थिती ऐंशीच्या दशकातील आहे.

'बोलावे ते आम्ही' मधली कविता जागतिकीकरणा नंतरच्या बहुस्तरीय सांस्कृतिक गुंतागुंतीचा विचार करणारी आहे. 'एक एक पाथ निंदून व्हावी तशी संपून जातात वर्ष' या ओळीत कष्टकऱ्यांच्या आयुष्याची स्थिती व्यक्त झाली आहे. लहानपणापासून तर म्हातारपणापर्यंत बाया शेत निंदण्याचे काम करतच आहेत तरी त्यांच्या आर्थिक स्थितीत काहीच बदल झालेला नाही. 'मातीच्या देहावरचा सावलीचा तुकडा ते तोडणार आहेत. 'किंवा' मेलेलं जनावर काढावं सोलून तसं केलं जातं झाड मोकळ आरपार 'फोडून' अशा ओळींतून बेसुमार वृक्षतोडीचे अस्वस्थ करणारे वास्तव मांडले आहे.

शेतकरी पिकाला स्वतःच्या लेकराप्रमाणे जपतो. तरी त्याच्या वाट्याला दुःखच येते. त्याला खूप कष्ट करावे लागते. संसाराचा गाडा ओढण्यासाठी पसामूठ गोळा करावी लागते. उसवलेले जगणे, घटका घटका शिवत जाणे, ही त्याच्या नशिबाची कर्मकहाणी सांगताना हा शेतकरी म्हणतो....

"डोळे पोखरून काढली आसव
मातीच्या कोंभाला दिलं प्राक्तन
कोंभ वाढला डोळे जळाले
आयुष्य राख झालं
आमचीच हाड डोईवर बांधून
संध्याकाळी दारात आल"
बळिवंत , पृष्ठ. ४२



Copyright © | JET Network, All Rights Reserved

कितीही कष्ट केले तरी त्या कष्टातून मिळालेल्या उत्पन्नातून संसाराचा गाडा ओढणे कठीण होते. आयुष्य राख होतं आणि आयुष्य संपेपर्यंत हा खेळ चालूच राहतो. याची विदारक कहाणी कवी प्रतिमा, प्रतीकांच्या साह्याने आपल्या समोर ठेवतो. श्रीकांत देशमुख यांनी ग्रामीण जीवनाचे दाहक चित्रण विविध कवितांतून चित्रित केले आहे.

“भागीरथी काळेनं एन्ड्रीन पिऊन जीव दिला
कपाशीला नेमकीच बोंडअळी लागलेली
तीनं बोंडअळी मारण्याऐवजी
मारून घेतलं स्वतः लाच
वेगळं औषध आता उरलं नाही
माणसावर पडणाऱ्या रोगावर वापरण्याजोगं”
बळिवंत,पृष्ठ. ७

वरील कवितेच्या ओळी ‘स्वर्गाच्या वेशीवर’ कवितेतील आहेत. यामध्ये भागीरथी काळे नावाच्या एका स्त्रीने आत्महत्या केली. बोंडअळी मारण्यापेक्षा तिने स्वतःच जीवनच संपवल. तसेच ही कविता म्हणजे नापीक झालेल्या, अठराविश्व दारिद्र्य, या शब्दातही न मावणाऱ्या शेतकरी स्त्री-पुरुषांनी आत्महत्या केलेल्या, मरणपंथाला लागलेल्या गावाची व्यथा मांडणारी आहे. या गावाची अवस्था बेवारस कुत्र्यासारखी अगतीक झाली आहे. हे गाव मरणासंपन्न झाले आहे. रोज तीळ तीळ तुटण्या पेक्षा एकदाच संपूर्ण मरण मागत आहे. मरणासाठी ताटकळणाऱ्या असहाय, एकाकी, बेवारस गावाची शब्दातीत व्यथा स्वर्गाच्या वेशीवर या कवितेतून व्यक्त झाली आहे.

“वेशीवर वेशीतून दिसणाऱ्या माडीवर
गावाचे भोग”
बळिवंत, पृष्ठ. ८

‘शिवार’ कवितेत शेतशिवार, गावगाडा, शेतकरी, शेतमजूर यांची असहाय्य स्थिती दर्शवण्यात आली आहे. नापीकी, दुष्काळ, दारिद्र्य, स्थलांतर या साऱ्यांनी गावगाड्याचे कंबरडे मोडले आहे. नापिकी,दुष्काळ, दारिद्र्य, स्थलांतर यामुळे शेतकरी नागवला गेला आहे. या कवितेत या सगळ्या संकटाचा परिणाम माणसांच्या मनावर कशाप्रकारे झाला याचे चित्रण या कवितेत आलेले आहे. बळिवंत या कवितासंग्रहातील वारा या कवितेत ‘वारा नरभक्षक सळाळतो तक्षकासारखा’ अशा संहारक वाऱ्याने फुल कोमेजावं तस गाव कोमेजू लागतो.’ अशी वारा कविता गावाच्या संदर्भात येते. ‘माणसं’ नावाच्या कवितेत माणसांचे वर्णन ढगांची प्रतिमा वापरून केले आहे. ढग बरसावे तशी माणसे काळयाभोर मातीत कष्ट करीत तन, मन धनाणे अक्षरक्ष: रिती रिती होत राहतात.

“उन्हाळयातल्या रात्रीला
पहिली रात्र
न पाहताच माती घे धुऊन गेली
तुला रडूही आलं नाही
उन्हात वाळत घातलेले तुझे डोळे
चौफेरे जात्यावर दळत बसलीस
अशातही तू दाखवला समंजसपणा
वाट्याला आलेले भोग
चुकत नाहीत म्हणून”
बळीवंत, पृष्ठ. ३२

‘रांडपण’ कष्टकरी विधवा स्त्रीची व्यथा कथन करणारी कविता आहे. या कवितेतील विधवा स्त्रिया आपल्या पदरात आपले दुःख बांधून दुसऱ्यांसाठी जगली आहे. ती एकटी जगली पण हे एकटेपण, हे अपार दुःख सहन करीत



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

असताना तिने सत्व आणि स्वत्व प्राणपणाने जोपासले. अव्यक्त दुःख पदरात घेऊन स्वावलंबीपणाने व स्वाभिमानाने जगणाऱ्या दुःखाच्या पहाडासमोर न झुकणाऱ्या कितीतरी गावातल्या असंख्य माय माऊल्या डोळ्यासमोर उभ्या राहतात.

कितीही कष्ट केले तरी आर्थिक स्थिती सुधारतच नाही. रोजगार हमी शिवाय पर्यायही उरत नाही. अशा जीवनघेण्या आर्थिक घलमेलीत शेतकरी पंढरपूरच्या विठोबाला आपली कीव येत नाही म्हणून कळवळून म्हणतो

"तुझ्या काळजात, उठेल का कळ
माझा येओ वळ, तुझ्या लागी
तुझ्या काळजाचे,बायपास व्हावे
काळजाचे घाव, काढोनिया"
आषाढमाती, पृष्ठ. ३४

विठू माऊलीच्या काळजात कळ उठेल काय? विठोबाच्या काळजाचे बायपास सर्जरी करण्याची कल्पना तत्कालीन जीवघेण्या अर्थ करण्यातून निर्माण झाली आहे. गावातील तरुण पोरं आत्महत्या करतात. ऐन महालक्ष्मीच्या दिवशी आत्महत्या करणारा देवराव पाटलाचा मुलगा आहे. माळाच्या करपाडीत ऑटो उलटून मेलेला जना माळयाचा मुलगा आहे.

"माती आड गाडली जाणारी बिन लग्नाची पोरं
अशी कितीतरी हाडं गावाच्या आसपास भुईत
वर्षानुवर्ष ज्ञानेश्वरांच्या समाधी सारखी मग्न असतात पडून"
आषाढमाती, पृष्ठ. ७१

या कवितेत सुद्धा तरूण पोरांच्या आत्महत्या म्हणजेच ग्रामीण समाज जीवनाचे दाहक वर्णन आलेले आहे. शेतकरी कर्जबाजारी झाला आणि या कर्जामुळे त्याला दुसरा पर्याय सुचत नसल्यामुळे आत्महत्या करू लागला. या कवितेत आत्महत्येने, अपघाताने मेलेल्या तरुणांच्या गावाचे, माणसांचे आभाळभर दुःख व्यक्त झाले आहे. बोलावे ते आम्ही या कवितासंग्रहात जागतिकीकरणानंतरच्या बहुस्तरीय, सांस्कृतिक गुंतागुंतीचा विचार करण्यात आलेला आहे. कवी या कवितेत सांस्कृतिक, आर्थिक काही प्रमाणात राजकीय पर्यावरण कवेत घेताना दिसत आहे. या कवितेत प्रखर वास्तवाचे भान दिसून येत आहे.

"वाळवंटातल्या वाळू सारखं आपलं शरीर
रक्तमास, पेशी, हाडांचा भुगा
खत कारखान्यांना जैविक खतनिर्मितीसाठी
शेती पिकत नाही म्हणून विकावी
स्केअर फुटाप्रमाण वस्ती आसपासची
तसं बाजारी"
आषाढमाती

'आषाढमाती' मधील कविता केवळ आधुनिकच नाही तर परंपरेच विद्रुपीकरण करणारी ही कविता उत्तर - आधुनिकतेच्या दिशेने वाटचाल करते. व्यक्तीबरोबर समाजाचेही अस्तित्वही शून्य होत चालले आहे. भारतीय परंपरेचा मूळ समूहभाव नष्ट होत चाललाय. सगळी व्यवस्थाच सडून गेल्याचे भान ही कविता व्यक्त करते.

"पोटातली भूक पचवून
कष्टकऱ्यांच्या आतड्यांच्या खोल तळाशी
अंधार देतो जगाला एक सार्वत्रिक लय
कुठल्याही इझम पलीकडची अनाकलनीय"



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

बोलावे ते आम्ही, पृष्ठ ३१.

'अंधार' कविता शेतात कष्ट करणारे मजूर, शेतकरी यांच्या पोटातील मरणाऱ्या भुकेला त्यांच्या आयुष्यातील दुःखाला कुठल्याही 'इझम' च्या माध्यमातून पाहता येत नाही.

"पावसाने ओली सावळी माती
न थकता आजूबाजूला न पाहता
जीवाचा कोंगता करून सत्तावीस बाया निंदताहेत
न थकता पदराआडून, कधी ओणव्या होऊन
कमरेला आलेली कळ दाबून, भूमीच्या गर्भात डोकावून
माय बहिणीशी बोलावं तसं हजारो बाया मातीशी बोलताहेत
भूमीची निरी आलटून पालटून उकलत
गर्भारिणीला द्यावा अलगद अंकुरण्याचा होकार
अगणित बाया माती सोबत माती होताहेत'
बोलावे ते आम्ही, पृष्ठ. ३४,३५.

भूमी आणि स्त्री यांच्या नवनिर्माण क्षमतेचे आणि शोषित कष्टाचे हे रूप कृषी संस्कृतीच्या आदीम माऊलीचे एक चित्र आहे. 'नींदनाऱ्या बाया' या कवितेतून स्त्रीचे कष्ट आपल्यासमोर मांडण्यात आले आहे. आधी शेतात निंदन, खुरपण हे काम बायाच करत होत्या. आता याकरिता ट्रॅक्टर आलेले आहेत. ट्रॅक्टरने आता नांगरणी, वखरणी करून शेती स्वच्छ करण्यात येते. पण जागतिकीकरणाने कृषी संस्कृतीमधील हे जे काही परिवर्तन घडवून आणले आहे खरे म्हणजे त्यामुळे शेतीवाडीत राबणाऱ्या कष्टकरी बायका माणसांचे शारीरिक श्रम खूप कमी झालेले आहेत. हे सगळे यंत्रिकीकरणाने घडून आलेल आहे.

"अंत्ययात्रेतही लोकांना बाजूला ठेवता येत नाही मोबाईल
इतकी जवळ आलीत माणस ओळखू येत नाही एकमेकांना
तुझ्या कवितेतला बाया माणसांचा, थकल्याभागल्यांचा बिनचेहरा
चाललाय कायम रेंज बाहेर
कुठलाच अँटेना नाही सापडत त्याला मुठीत घ्यायला"
बोलावे ते आम्ही, पृ.१७४

या कवितेमध्ये समाजामध्ये माणसापासून माणूस कसा तुटत चालला, नातीगोती कशाप्रकारे कमकुवत होऊन एकमेकांविषयी प्रेम कमी झालेल आहे, एकमेकांविषयीचा जिव्हाळा मोबाईल सारख्या साधनाने कमी झालेला आहे, हे विदारक सत्य इथे कवी चित्रित करताना दिसतात. देशमुख यांची कविता शेती विषयी, माती विषयी, तिच्याशी निगडित असलेल्या सांस्कृतिक गोष्टींविषयी, झाडापेडाविषयी, किड्या, पाखरांविषयी बोलते आहे. ते सारेच घटक नव्या काळाच्या वरवंट्या खाली चिरडले जात आपले अस्तित्व गमावू लागले आहेत. या गोष्टीची जाणीव झालेला कवी कधी थेटपणे तर कधी सूचकपणे याची वाच्यता करू पाहतो आहे.

**समारोप**

कवी श्रीकांत देशमुख यांनी त्यांच्या कवितांमधून ग्रामीण भागातील कृषक समाजाचे दाहक चित्रण रेखाटले आहे. १९९० नंतर जागतिकीकरणामुळे समाज व्यवस्था अंतर्बाह्य ढवळून निघाली. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण यामुळे परिवर्तन निर्माण झाले. शेतीचे दुबळेपण, खेड्याचे व ग्राम संस्कृतीचे बकालपण, दारिद्र्य, भूक, उपासमार, स्त्री शोषण, कृषी संस्कृतीचा ऱ्हास, दहशत, फसवणूक, मानवतेचे अवमूल्यन, मानवाच्या अस्तित्वाची निरर्थकता हे कवितेचे आशय सूत्रे आहेत. यांची कविता कल्पनेला अजिबात स्थान देत नाही. तर विचार विश्लेषण, विद्रोह, आत्मभान यांना या कवितेत केंद्रस्थान मिळाले आहे. शेतकऱ्यांची मानसिकता त्यांच्यातील विसंगतवृत्ती,



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

दुबळेपणा, दुभंगलेपण इत्यादीची जाणीव कविता करून देते. आजच्या विस्कळीत जीवन व्यवस्थेचे शल्य प्रकट करून काही प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न ही कविता करते.

**संदर्भ**

१. देशमुख श्रीकांत, बळीवंत, शब्दमल्हार प्रकाशन, मुंबई नाका, नाशिक, चौथी आवृत्ती २०२३.
२. देशमुख श्रीकांत, बोलावे ते आम्ही, शब्दालय प्रकाशन, तिसरी आवृत्ती, २०२३.
३. शिंदे राजशेखर, 'बळीवंत आम्ही', (श्रीकांत देशमुख यांच्या कवितेची समीक्षा) शब्दमल्हार प्रकाशन. प्रथम आवृत्ती, २०२१.



Copyright © | JET Network, All Rights Reserved